॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/७-अ /कोरोना/१६२४/२०२० दि.२९/०३/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :- कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाय योजना म्हणून विद्यापीठाच्या माहे मार्च/एप्रिल/मे,२०२० मधील परीक्षा दि.१४ एप्रिल,२०२० पर्यंत स्थगित करण्याबाबत.**

**संदर्भ:-** (१) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग संकिर्ण-२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१,दि.१६ मार्च,२०२०
(२) विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक १४४/२०२०,जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना (कोव्हीड-१९)१४९/२०२०,दि.१६.०३.२०२०
(३) परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाचे पत्र क्र.कबचौउमवि/७अ/कोरोनो/परीक्षा स्थगिती/कु.१५०/२०२०, दि.१६.०३.२०२०
(४) विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक १४८/२०२०,जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना (कोव्हीड-१९)१६५/२०२०,दि.२८.०३.२०२०
(५) विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक १४९/२०२०,जा.क्र.कबचौउमवि/२/कोरोना (कोव्हीड-१९)१६६/२०२०,दि.२८.०३.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भांकीत पत्र व परिपत्रकांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या असून,शासनाच्या निर्देशानुसार प्रस्तूत विद्यापीठाच्या माहे मार्च/एप्रिल/मे,२०२० मधील दि.१७ मार्च,२०२० पासून आयोजित करण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परीक्षा व दि.१९ मार्च,२०२० पासून ते ३१ मार्च,२०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व लेखी परीक्षा ३१ मार्च,२०२० पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

गृह विभाग,भारत सरकार यांचे दि.२४.०३.२०२० आणि महाराष्ट्र शासनाचे पत्र दि.२५.०३.२०२० अन्वये प्राप्त निर्देशान्वये संदर्भांकीत (४) व (५) वर नमूद विद्यापीठ परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत, त्यास अनुसरून या पत्रान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाद्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) ह्या दि.१४ एप्रिल,२०२०पर्यंत स्थगित करण्यात येत असून, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या आयोजनाबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार वेळोवेळी आढावा घेऊन त्या अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

वरील बाब आपल्या अधिनस्थ विद्यार्थी/शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील )
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीसाठी.

१. मा.कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२. मा.प्र-कुलगुरू कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३. मा.प्र-कुलसचिव कार्यालय,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
४. मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
५. परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव